## प्रकरण ४ थे

## // संशोधन पद्धती //

## PROCEDURE **

// प्रकरण ४ थे //

## -=:0 संशोधन पध्दती 0:=-

सामाजिक शास्त्रात संशोधनासाठी समस्येचे स्वरुप, क्षेत्र, संशोधनाचा कालावधी इत्यादीच्या अनुषंगाने त्या त्या संशोधन पध्दतीचा अवलंब केला जातो. सामान्यपणे सामाजिक शास्त्रात पुढील संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येतो. ऐतिहासिक संशोधन पध्दती, सर्वेक्षण संशोधन पध्दती, प्रायोगिक संशोधन पध्दती, तुलनात्मक कार्यकारण पध्दती, सहसंबंध पध्दती, व्यक्ति अभ्यास पध्दती, वांशिक पध्दती [ किंवा तिलाच विकासात्मक पध्दती 0 Development Method म्हणतात ] अशा अनेक पध्दतीची चर्चा करण्यात येत असली तरी संशोधनाची उद्दिष्टे, माहिती संकलनाचे तंत्र, नियंत्रण, तंत्र व साधने क्षेत्र इत्यादी अनेक प्रकारच्या आधारावर शैक्षणिक संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात येते. संशोधन पध्दतीचे खालील तीन गटात केलेले वर्गीकरण सर्वमान्य आहे.

[१] ऐतिहासिक संशोधन पध्दती —
[२] सर्वेक्षण संशोधन पध्दती.
[३] प्रायोगिक संशोधन पध्दती.

पाश्चात्य राष्ट्रात आणि भारतात सर्वेक्षण प्रकल्पाची संख्या फार मोठी आहे. संशोधनात दुय्यम महत्व असलेली पण व्यवहारात विशेष करुन प्रचलित असलेली ही पध्दती आहे. तीचा विशेष उपयोग होत असला तरी तीच्या नावाच्या बाबतीत एकवाक्यता नाही.

सर्वेक्षण [ Survey ] आदर्शमूलक सर्वेक्षण [ Normative Survey स्तर [ Status ] आणि वर्णनात्मक पध्दती [ Descriptive Method ] अशा विविध नावांनी ती प्रचलित आहे. शब्दाच्या छटा भिन्न असल्या तरी त्या सर्वांतून एक आशय स्पष्ट आहे की, अभ्यासवस्तुची वर्तमान स्थिती कशी आहे हे पाहण्याकरीता वापरली जाणारी ती पध्दती आहे.

सद्यःस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणाऱ्या संशोधन पध्दतीला सर्वेक्षण पध्दती असे म्हणतात. "या प्रकारचे संशोधन सद्यःस्थितीचे वर्णन करते आणि सद्यःस्थिती स्पष्ट करते. वर्तमान असलेले संबंध, प्रचलित परिपाठ, दिसून येणाऱ्या निष्ठा, दृष्टिकोन आणि अभिवृत्ती, सुरु असलेल्या प्रक्रिया, जाणवणारे परिणाम, विकसित होत असलेले विचार प्रवाह यांच्याशी ते संबंधित असते"- १७. सर्वेक्षण ही म्हणजे प्रचलित तथ्याचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण व मुल्यांकन होय. सर्वेक्षण निव्वळ माहिती संकलित करणे आणि पत्रके तयार करणे एवढयापुरतेच मर्यादित नाही. त्यात मापन, वर्गीकरण, अर्थनिर्वचन आणि मुल्यांकन यांच्या आधारे वर्ण्य विषयाचे स्पष्टीकरण, तुलना व सार्थकता असते.

विभिन्न देशातील वर्तमान स्थितीचा अंदाज घेणे, संस्था नियोजनाकरीता आवश्यक माहिती गोळा करणे आणि उच्च संशोधन समस्येची उकल करण्याकरीता आवश्यक असलेली वर्तमान स्थिती समजून घेणे. यासाठी सर्वेक्षण केले जाते.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

१७] रिसर्च इन एज्युकेशन - बेस्ट पृष्ठ क्रं. १०२.

" Normative Survey research collects three types of information of what exists, of what we want, and of how to get there and is, thus, highly purposive"-18.

"सर्वेक्षण एका टोकाला निव्वळ माहितीचा कोश आहे तर दुसऱ्या टोकाला प्रयोग आहे. त्यामुळे निव्वळ माहिती संकलनाचा त्यात अंतर्भाव होतो तर प्रयोगशिलतेचे व त्यावरुन अनुमान काढण्याची प्रवृत्तीही त्यात आढळते. या दृष्टीने विचार करता सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मुल्यांकन होय असे म्हणता येईल. त्यात सर्वेक्षण आहे तसेच वर्णनही आहे" - १९.

सर्वेक्षणामुळे विशिष्ट क्षेत्रातील वर्तमान स्थितीचे यथार्थ चित्र कळते. कोणकोणत्या बाबी, कोणत्या स्थितीत उपलब्ध आहेत याची माहिती कळते. समस्या निराकरणाकरीता कोणती स्थिती अपेक्षीत आहे. हे अन्य सर्वेक्षणाच्या आधारे कळते. व ही अपेक्षित स्थिती प्राप्त करुन समस्येची उकल करण्याकरीता कोणत्या साधनांची व प्रयत्नांची आवश्यकता आहे हे त्यामुळे कळते.

एखाद्या समस्येशी संबंधित असलेल्या वास्तविक तथ्यांच्या आधारावर वर्णनात्मक विवेचन करता यावे म्हणुन त्या विषयाच्या बाबतीत यथार्थ व पुर्ण माहिती प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. अशी यथार्थ व साधारण माहिती नसेल तर ते वैज्ञानिक संशोधन म्हणविले जाणार नाही. वैज्ञानिक वर्णनाचा आधार वास्तविक व विश्वसनिय

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

18) Elements of Educational Research S.P. Sukhta, P.V. Mehrotra Third Revised Ed. 1974 P. 224.

१९] शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे प्रा. मुळे व प्रा. उमाठे पृष्ठ. १११.

तथ्ये होत. विषयाशी संबंधित असलेल्या तथ्याचे एक किंवा अधिक वैज्ञानिक पध्दती वापरुन वास्तविक तथ्ये संकलित केली जातात.

समस्येचे स्वरुप व मर्यादा यानुसार संशोधनाचे कामी कोणत्याही पध्दतीचा अवलंब केला जाउ शकतो. या संशोधनात संशोधकाने वेळेचे भान ठेउन व समस्येच्या क्षेत्राची व्याप्ती व मर्यादा लक्षात घेउन सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. बहुधा वर्तमान परिस्थितीचा अभ्यास करीत असतांना या पध्दतीचा उपयोग केला जाणे जास्त संयुक्त असते हे अनुभवाने सिध्द झाले आहे. संशोधकाला वरळी शहरातील वर्तमान स्थितीतील माध्यमिक शाळांची शारीरिक शिक्षणाच्या संबंधातील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीच उपयुक्त असल्याने तिचाच अवलंब केला आहे.

सर्वेक्षण पध्दतीचा किंवा कुठल्याही पध्दतीचा अवलंब करीत असतांना त्या पध्दतीला अनुसरुन संशोधन साधनांचा उपयोग करावा लागतो. त्यात प्रामुख्याने मुलाखती [ Interview ] अनुसूची व प्रश्नावली [ Schedule and questionnaire ] प्रत्यक्ष निरिक्षण, सहभागी निरिक्षण [ Participant Observation ] सामुदायिक रेकार्ड [Community Records ] व त्याचे विश्लेषण इत्यादी तंत्राचा प्रसंगानुसार उपयोग केला जातो.

संशोधकाने समस्येच्या क्षेत्राचे स्वरुप व मर्यादा लक्षात घेउन प्रश्नावली या साधनाचा उपयोग केला आहे. त्याचप्रमाणे वेळेची उपलब्धता लक्षात घेउन व उद्दिष्टानुसार प्रश्नावली तयार केली आहे. प्रश्नावलीमध्ये जास्तीत जास्त उद्दिष्टाचा समावेश होईल याची काळजी घेउन व सत्य परिस्थितीची माहिती मिळविण्याच्या हेतुने प्रश्नावली तयार केली आहे.

प्रश्नावलीच्या प्रारंभी संशोधकाची थोडक्यात माहिती [प्रश्नावली भरणा-याला असावी म्हणून] दिली. तसेच संशोधनाचा विषय पण प्रथमच दिला व त्याच बरोबर संशोधनाचा उपयोग कोणत्या कारणासाठी करण्यांत येणार आहे हे स्पष्ट करण्यांत आले, ज्यामुळे प्रश्नावली भरणा-याच्या मनात संकोच न राहता त्याच्याकडून स्पष्टपणे व सत्यपरिस्थितीनुसार माहिती भरली जावी याचा प्रयत्न केला गेला.

तसेच प्रश्नावली भरण्यासंबंधीच्या सुचना दिल्या. काही प्रश्न"होय/नाही" क्यां बर्यायी उत्तरानी देण्यासारखे आहेत. तर काही प्रश्नाच्या बाबतीत उत्तरे शब्दात/अंकात नोंदवण्याची गरज असल्याने समोर उत्तर नोंदवण्यासाठी पुरेशी जागा सोडण्यांत आली. तर काही प्रश्नाच्याबाबत दोनपेक्षा अनेक पर्याय प्राधान्याने व गौण स्वरुपात नोंदविण्याची गरज वाटल्याने प्रश्नावली भरुन देणा-यास तशी सुचना दिली. काही प्रश्नाच्या उत्तराचे पर्याय प्रश्नावलीतच देऊन योग्य त्या पर्यायावर योग्य ती खुण करण्यांस सुचना दिली.

प्रश्नावली मध्ये प्रारंभी प्रश्नावली भरणा-या शारीरिक शिक्षकाचे नांव, त्याचा हुद्दा तो नोकरी करीत असलेल्या शाळेचे नांव, त्याचे वय, त्याची शैक्षणिक पात्रता व शिकविण्याचा अनुभव इत्यादीची माहिती मिळावी म्हणून चौकशीचे प्रश्न घातले. शैक्षणिक पात्रतेमध्ये सामान्य व व्यावसायीक असे भाग पाडले. हे करण्यांचा उद्देश असा की, त्याची शैक्षणिक पदवी [ वेसिक डिग्री ] व व्यवसायीक शैक्षणिक पात्रता या दोहोंमध्ये कांही सहसंबंध आहे की, काय हे कळावे. शिवाय असे करण्याने त्या शिक्षकाच्या गुणवत्तेबद्दल काही विधान करणे शक्य होईल असे वाटले.

संशोधकाने वेळेचे बंधन लक्षात घेऊन १०.७.८८ ला प्रश्नावली तयार करण्यास सुरुवात केली. मार्गदर्शकाच्या साह्याने उद्दिष्टाकडे लक्ष ठेऊन प्रश्नावली एका महिन्यात तयार केली गेली. सर्व उद्दिष्टाच्या अनुषंगाने त्यात प्रश्नांचा समावेश करण्याचा प्रयत्न केला गेला. तयार झालेल्या प्रश्नावलीत काही अपूर्णता राहू नये म्हणून संशोधन क्षेत्रातील काही तज्ञाच्या अवलोकनार्थ प्रत्यक्ष दाखविली व त्यानुसार दुरुस्त्या केल्या.

त्यानंतर १.८.८८ पासून संशोधकाने स्वत: प्रत्येक शाळेत जाऊन शारीरिक शिक्षकाच्या भेटी घेऊन प्रत्यक्षात प्रश्नावलीचे वितरण केले.

प्रश्नावलीचे वितरण करण्यासाठी जवळजवळ पंधरा दिवस लागले. कारण पोस्टाने प्रश्नावली पाठवण्याची कुठलीच तरतूद केली गेली नाही. या सर्व प्रश्नावल्या पंधरा दिवसात भरुन परत घेता येतील अशी अपेक्षा होती पण प्रत्यक्षात त्या भरुन परत मिळायला जवळ जवळ दोन महिन्याचा अवधी लागला, कारण प्रश्नावली भरुन देण्यास काही शारीरिक शिक्षकांनी हवा तेवढा उत्साह दाखवला नाही. संशोधकाने स्वत: भेटी देऊन स्मरण देऊन दिवस ठरवून नंतर जाऊन प्रश्नावल्या गोळा केल्या. या पध्दतीने प्रश्नावल्या गोळा करण्यासाठी दोन अधीक महिन्याचा अवधी लागला. प्रश्नावली तयार करणेकामी [ कागद, टायपिंग, सायक्लोस्टायलिंग इ. साठी ] दोनशे रु. खर्च आला. प्रश्नावल्या भरुन परत मिळविल्यानंतर त्यामधील माहितीचे पृथ:करण, संख्येचे अनुमान, निष्कर्ष इ. साठी पुढील तीन महिन्यांचा काळ लागला.